

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रम संस्कार शिबीर कार्यक्रम अहवाल

## दत्तक ग्राम वाढोणा - 02.03.2022 ते 09.03.2022

## सत्र 2021-22

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, मतदार जनजागृती, जल पुनर्भरण प्रकल्प, कुटुंब सर्वेक्षण, हळद लागवड कार्यशाळा
घर घर संविधान गाव गाव संविधान, व्यसनमुक्ती, युवा स्वास्थ्य, ग्राम स्वच्छता, गौळण व श्रम दिंडी इत्यादी

दत्तक ग्राम वाढोणा (गा), ता. धामणगाव रेल्वे, जि. अमरावती ४४४७०९

Azadi Ka Amrit Mahotsav

राष्ट्रीय सेवा योजना




**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित**

धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित

**आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय,**
**धामणगाव रेल्वे जि. अमरावती - ४४४७०९**

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नाव | : | धामणगाव एज्युकेशन सोसायटी, हिंदी भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था, धामणगाव रेल्वे |
| **महाविद्यालयाचे नाव** | **:** | **आदर्श विज्ञान ज. भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे** |
| **सत्र** | **:** | **२०२१-२२ (कॉलेज कोड १०६)** |

# : विशेष श्रम संस्कार शिबिर कार्यक्रम अहवाल :

**अनुक्रमणिका**



| अनु. क्रं. | घटक (Particulars) | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | नियमित लेखे | सुरुवातीला |
| २. | उपयोगिता प्रमाणपत्र | सुरुवातीला |
| ३. | पावत्या व देयक खाते | सुरुवातीला |
| ४. | राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी यादी | सुरुवातीला |
| ५. | रा. से. यो. विशेष शिबिर निबंधात्मक अहवाल | ०३ ते ०६ |
| ६. | अभिप्राय | १२ ते १५ |
| ७. | आर्थिक मुल्यांकन व विशेष शिबिर अंतर्गत राबवविलेले उपक्रम W – 2359, 2596 | -- |
| ८. | फोटो | ०७ ते ११ |
| ९. | वृत्तपत्र कात्रण | १६ |

जल पुनर्भरण प्रकल्प, पर्यावरण संवर्धन, पेय जल तपासणी, प्लास्टिक निर्मुलन, झिरो वेस्ट व्यवस्थापन, स्मशान-भूमी स्वच्छता, ग्राम-स्वच्छता, वृक्ष-संवर्धन, आरोग्य विषयक जन जागृती, जलसंवर्धन, कोरोना जन जागृती, कोरोना लसीकरण विषयक जन जागृती, कुटुंब सर्वेक्षण, अंधश्रद्धा निर्मुलन, महिला सक्षमीकरण, बेटी बचाव, पाणी अडवा पाणी जिरवा, इत्यादी उद्देश घेवून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेंद्र गांडोळे यांच्या मार्गदर्शनात दत्तक ग्राम वाढोणा (गा.), धामणगाव रेल्वे येथे ०८ दिवसीय राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबीर दि ०२ मार्च २०२२ ते ०९ मार्च २०२२ दरम्यान प्रा. श्रीकांत पाटील कार्यक्रम अधिकारी यांच्या नेतृत्वात व डॉ. प्रवीण केचे सहायक कार्यक्रम अधिकारी आणि डॉ. पूनम गहुकर महिला सहायक कार्यक्रम अधिकारी यांच्या संयोजनाखाली, प्रा विशाल मोकाशे, आदर्श बरवट यांच्या सहकार्याने १०० स्वयंसेवकाच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले.

**दि ०२ मार्च २०२२ बुधवार** रोजी दुपारी १.४५ ला जि. प. प्राथमिक शाळा, वाढोणा ग्राम येथे विद्यार्थ्यांचे शिबीरस्थळी आगमन झाले. आगमनानंतर प्राथमिक शाळा परिसर स्वच्छ करण्यात आला. शिबिराची पूर्वतयारी, परिसर स्वच्छता, गावकऱ्यांशी चर्चा व शाळेतील मुख्याध्यापिका सौ प्रतिभा मनोहर व इतर शिक्षिका यांच्याशी चर्चा केली व आलेल्या शिबिरार्थींची शिबिरस्थळी नोंदणी करण्यात आली. त्यानंतर गावच्या निवडलेल्या प्रकल्पाची पाहणी केली आणि प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी गावकऱ्यांसोबत चर्चा करून शेवटी श्रमदानाची तयारी केली.

**दि ०३ मार्च २०२२** गुरूवार रोजी सकाळी ६.३० पासून शिबिराचे पूर्ण नियमित कार्यक्रम सुरु झाले. सकाळी प्रार्थना व योगासनं झाल्या नंतर संपूर्ण गावात प्रभात फेरी काढण्यात आली व संपूर्ण गाव झाडून स्वच्छ करण्यात आले. सोबतच गावातील कुटुंब सर्वेक्षण शिबिरार्थींद्वारे करण्यात आले. या उपक्रमामध्ये गावातील जनतेचे सहकार्य लाभले आणि ठरवलेल्या प्रकल्प जागेवर जाऊन प्रकल्पाची कामे केली व स्वच्छता करून श्रमदानाची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर उदघाटन समारंभाची संपूर्ण तयारी केली. शिबिराच्या उद्घाटन समारंभाला अध्यक्ष म्हणून मा. ॲड. रमेशचंद्रजी चांडक, अध्यक्ष, धामणगाव एज्युकेशन सोसायटी धामणगाव रेल्वे, उद्घाटक म्हणून ॲड. आशिषकुमारजी राठी, सचिव, धामणगाव एज्युकेशन सोसायटी धामणगाव रेल्वे, प्रमुख अतिथी म्हणून मा. डॉ. असितकुमारजी पसारी, सहसचिव,

धामणगाव एज्युकेशन सोसायटी धामणगाव रेल्वे, गावाचे प्रथम नागरिक श्री प्रशांत भाऊ हुडे, सरपंच वाढोणा, श्री विजय पाटील, श्री रुपेश तीतरे, सौ. प्रतिभा मनोहर, यांची उपस्थिति लाभली. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सचित्र वार्षिक/ नियमित उपक्रम पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याचे सूत्र संचलन, पाहुण्यांचा परिचय डॉ. पूनम गहुकर व प्रास्ताविक प्रा. श्रीकांत पाटील तर आभार प्रदर्शन डॉ. प्रवीण केचे यांनी केले. याच दिवशी सायंकाळी संपूर्ण शिबिरार्थ्यांना पुढील सूचना देऊन त्यांची गट विभागणी करण्यात आली.

**दि. ०४ मार्च २०२२**, शुक्रवार रोजी सकाळी ०६.३० वाजता प्रार्थना, योगासन व सूर्य नमस्कार घेण्यात आले व त्या नंतर सकाळी ०९.०० वा. प्रभात फेरी च्या माध्यमातून ग्राम स्वच्छता, कोरोना विषयक जन जागृती करण्यात आली. त्यानंतर वाढोणा गावाची स्मशानभूमि स्वच्छता सर्व शिबिरार्थ्यांनी एकत्रित येऊन केली व स्मशानातील संपूर्ण झाडांची रंग रंगोटी केली त्यामुळे स्मशानभूमिचे संपूर्ण चित्र पालटून गेले. दुपारच्या बौद्धिक सत्रा मध्ये मतदार जन जागृती अभियाना अंतर्गत "युवकामधील राजकीय जागृती" या प्रा. श्री पंकज धामसे, आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे यांचे व्याख्यान संपन्न झाले. लोकशाहीमध्ये संपूर्ण मतदान प्रक्रिये मध्ये आपल्या एका मताने कशा प्रकारचे परिवर्तन घडून येऊ शकते याचे सुंदर विवेचन त्यांनी शिबिरार्थ्या समोर केले. त्या नंतर सायंकाळच्या सत्रा मध्ये औषधी वनस्पती व रोग प्रतिकार शक्ती या विषयावर प्रा. संदीप पेंदाम, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख, आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे यांनी आपले विचार व्यक्त केले. रात्रीच्या सत्रातील पथ नाट्य प्रशिक्षण हा विषय घेऊन महाविद्यालयातील निवडक माजी रा. से. यो. स्वयंसेवक काजल वानखेडे, युगा धोपटे, आकाश हांडे आदर्श बरवट इ. यांनी नवीन रासेयो स्वयंसेवकांना पथ नाट्य कसे करावे या वर वेगवेगळे प्रात्यक्षिके दाखवून मोलाचे मार्गदर्शन केले.

**दि. ०५ मार्च २०२२**, शनिवार, रोजी सकाळी ०६.३० वाजता प्रार्थना, योगासन व सूर्य नमस्कार घेण्यात आले व त्या नंतर सकाळी ०७.३० वा. बोधी बुडोकॉन कराटे चमू धामणगाव रेल्वे अंतर्गत आत्मरक्षा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या दरम्यान कराटे प्रशिक्षक श्री सचिन मून (ब्लॅक बेल्ट) यांनी सर्व शिबिरार्थींना कठीण प्रसंगामध्ये स्वतःचे आत्मरक्षण कसे करावे या बाबत प्रात्यक्षिका सह मार्गदर्शन केले व प्रभात फेरी च्या माध्यमातून सर्व गावकऱ्यांना चित्त थरारक कराटे प्रात्यक्षिके करून दाखवली. सोबतच ग्राम स्वच्छता, कुटुंब सर्वेक्षण, कोरोना विषयक जन जागृती करण्यात आली. सकाळी १०.०० वाजता रक्त गट तपासणी शिबिर, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या सौजन्याने संपन्न करण्यात आले. या दरम्यान ९५ व्यक्तींनी आपले रक्तगट तपासणी करून घेतली. दुपारच्या बौद्धिक सत्रा मध्ये "घर-घर संविधान गाव-गाव संविधान" अभियाना अंतर्गत "संविधान जन जागृती" या विषयावर प्रा. रत्नशील खोब्रागडे, संगणक शास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांचे व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी भारतीय संविधानाच्या वेगवेगळ्या महत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकला. त्या नंतर सायंकाळच्या सत्रा मध्ये "परदेशातील उच्च शिक्षणाच्या संधी" या विषयावर डॉ. हर्शल मुंगसे सहा. प्राध्यापक, रसायन शास्त्र विभाग, आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे यांनी आपले राहते घर ते क्योटो विद्यापीठ क्योटो, जपान पर्यंतचा आपला प्रेरणादायी प्रवास शिबिरार्थ्यांसमोर मांडला. रात्रीच्या सत्रामध्ये वंदनीय राष्ट्र संत तुकडोजी महाराज यांच्या जन जागृती पर भजनाचा कार्यक्रम गुरुदेव सेवा मंडळ वाढोणा व रा. से. यो. चमू आदर्श महाविद्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाला.

**दि. ०६ मार्च २०२२**, रविवार रोजी सकाळी ०६.३० वाजता प्रार्थना, योगासन व सूर्य नमस्कार घेण्यात आले व त्या नंतर सकाळी ०८.३० वा. प्रभात फेरी च्या माध्यमातून ग्राम स्वच्छता, कोरोना विषयक जन जागृती करण्यात आली. सकाळी ०९.०० ते १२.३० पर्यंत सुरू झालेल्या प्रभातफेरी चे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण गावात प्रभात फेरी, श्रम-दिंडी, गवळण व

समाजप्रबोधनाच्या माधवातून प्लास्टिक मुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसन मुक्ती, स्त्री-भृण हत्या या विविध विषयावर पथ-नाट्याचे सादरीकरण करण्यात आले. त्या सोबतच लोप पावत चाललेली पारंपारिक संस्कृती व ग्रामीण भागातील मनोरंजनाचा गेली अनेक वर्षापासून वारसा जोपासत आलेली गवळण देखील या श्रम-दिंडीचा भाग होता. गावातील पुरुष व महिला भजनी मंडळ यांनी देखील मोठ्या उत्साहात श्रम-दिंडी मध्ये सहभाग नोंदविला. सोबतच वारकरी संप्रदायातील पावली नृत्य याचाही आनंद स्वयंसेवकांनी अनुभवला. या वेळी माजी स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या श्रम-दिंडीचे गावकऱ्यांनी घरोघरी रांगोळी काढून ठिकठिकाणी स्वागत व पूजन केले. या वेळी श्रेष्ठ समाजसेवक श्री त्र्यंबकराव गायकवाड प्रामुख्याने उपस्थित होते. संपूर्ण गावामध्ये स्त्री-पुरुष व बालगोपाल रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून अगदी औत्सुक्याने श्रम दिंडी मध्ये उपस्थिति दर्शविली. शेवटी 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' च्या गजरात पावली व फुगडी खेळून श्रम दिंडीचा समारोप करण्यात आला. दुपारच्या बौद्धिक सत्रा मध्ये "विद्यार्थी व भविष्यातील संधी" या विषयावर प्रा. श्री जितेंद्रसिंग बारूळकर, सहा. प्राध्यापक आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे यांचे व्याख्यान संपन्न झाले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या समाज सेवेचा उपयोग हा आपल्या करियर मध्ये कसा उपयोग होऊ शकतो व समाजसेवा या विषयावर सुद्धा आपण करियर करू शकतो यावर त्यांनी आपल्या अनोख्या शैली मध्ये प्रकाश टाकला. त्या नंतर सायंकाळच्या सत्रा मध्ये "राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालयीन विद्यार्थी" या विषयावर प्रा. डॉ. नरेंद्र नागपुरे माजी रासेयो कार्यक्रम अधिकारी, वाणिज्य विभाग, आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे यांनी आपले विचार व्यक्त केले. रात्रीच्या सत्रामध्ये हळद लागवड, प्रक्रिया व विक्री कार्यशाळा अंतर्गत श्री सदानंद पाटील, प्रगतीशील शेतकरी, रा. मुडाणा, ता. महागाव जि. यवतमाळ यांनी या आधुनिक शेती व हळद लागवड या विषयावर उपस्थित ग्रामस्थांना व शिबिरार्थींना कमी खर्चात अधिकाधिक उत्पन्न हळद लागवडीच्या माध्यमातून कसे घेता येईल या संदर्भात अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला गावकऱ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.

**दि. ०७ मार्च २०२२**, सोमवार रोजी सकाळी ०६.३० वाजता प्रार्थना, योगासन व सूर्य नमस्कार घेण्यात आले व त्या नंतर सकाळी ०९.०० वा. प्रभात फेरी च्या माध्यमातून ग्राम स्वच्छता, कोरोना विषयक जन जागृती करण्यात आली. सकाळी ०९.३० वाजता "पाणी अडवा पाणी जिरवा" मोहिमे अंतर्गत "जल पुनर्भरण प्रकल्प" (RAIN WATER HARVESTING) हा या वर्षीचा विशेष श्रम संस्कार शिबिरा दरम्यान राबवल्या जाणारा मुख्य उपक्रम असल्याने संपूर्ण शिबिरार्थ्यांनी गट विभागणी करून श्रमाचे वाटप केले व हा प्रकल्प पूर्णत्वास नेला. या श्रम दान दरम्यान काही विद्यार्थ्यांनी आळीपाळीने जल भरण खड्ड्याची निर्मिती केली व शास्त्रीय पद्धतीने त्याची बांधणी केली. काही विद्यार्थ्यांनी तज्ञ व्यक्ती चे सहकार्य घेऊन शाळेच्या छतावरील पावसाच्या पाण्याचे एकत्रीकरण करण्यासाठी पाईप बांधणी केली व संपूर्ण प्रकल्प पूर्णत्वास नेला. दुपारी ०३.०० ते ०४.३० वाजता धामणगाव येथील प्रसिद्ध नेत्र तज्ञ श्री मुकुंद साठे यांच्या सहकार्याने नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला ग्रामस्थांचा उत्तम प्रतिसाद मिळाला व सोबतच संपूर्ण शिबिरार्थ्यांनी आपली नेत्र तपासणी करून घेतली. त्या नंतर सायंकाळच्या सत्रा मध्ये "आजच्या युवकांपुधील आव्हाने" या विषयावर श्री सुभाषजी पुसदकर यांनी आपल्या ओजस्वी वक्तृत्वाच्या शैलीचा वापर करून शिबिरात उपस्थित असलेल्या नव तरुणांना आपल्या शब्द रचनेने प्रेरित केले. रात्रीच्या सत्रामध्ये "समाज माध्यमांचा यथोचित वापर" या विषयावर मा. श्री. संजय पवार, अप्पर आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती, तथा माजी अतिरिक्त जिल्हाधिकारी, अमरावती यांनी समाज माध्यमांचा वापर करत असताना विद्यार्थ्यांनी समाज माध्यमाचा विद्यार्थी दशेत असताना कसा वापर करावा हा विषय आपल्या जीवनामधील अनुभवाचा आधार घेऊन शिबिरार्थ्यांसमोर व्यक्त केला. सोबतच त्यांच्या स्वत:च्या रा. से. यो. मधील काही आठवणींना उजाळा दिला.

**दि. ०८. मार्च २०२२**, मंगळवार रोजी सकाळी ६.३० पासून शिबिराचे पूर्ण नियमित कार्यक्रम सुरु झाले. सकाळी प्रार्थना व योगासनं झाल्या नंतर संपूर्ण गावात प्रभात फेरी काढण्यात आली व संपूर्ण गाव झाडून स्वच्छ करण्यात आले. सोबतच गावातील कुटुंब सर्वेक्षण शिबिरार्थींद्वारे करण्यात आले. दुपारी ०१.०० वाजता शिबिर समारोप कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मा. श्री चंद्रशेखरजी पसारी, सदस्य धामणगाव एज्युकेशन सोसायटी धामणगाव रेल्वे, प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री लक्ष्मीनारायणजी चांडक, सदस्य धामणगाव एज्युकेशन सोसायटी धामणगाव रेल्वे, मार्गदर्शक म्हणून मा. प्राचार्य, डॉ. वाय. बी. गांडोळे तर प्रमुख उपस्थिति म्हणून श्री प्रशांत भाऊ हुडे, सरपंच, सौ. प्रतिभाताई मनोहर, मुख्याध्यापिका, सौ. सुरेखाताई हुडे, अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, वाढोणा, श्री त्र्यंबकराव गायकवाड व ई. मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. या शिबिर समारोपीय कार्यक्रमा दरम्यान जल पुनर्भरण प्रकल्प (RAIN WATER HARVESTING PROJECT) याचे अध्यक्षांचे हस्ते लोकार्पण करण्यात आले. या संपूर्ण शिबिराच्या यशस्वी आयोजनाकरिता व राबवविलेल्या उपक्रमाबद्दल मान्यवरांनी योजकाचे कौतुक, अभिनंदन केले व रासेयो च्या पुढील वाटचालींकरिता शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला उपस्थित असलेले प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे सरांनी या शिबिराच्या आयोजना दरम्यान वाढोणा गावकऱ्यांनी केलेलं सहकार्य ज्यामध्ये विशेष करून मुलींची राहण्याची व्यवस्था या बद्दल महाविद्यालयाच्या वतीने विशेष आभार व्यक्त केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचलन डॉ. प्रवीण केचे यांनी तर प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. पूनम गहुकर व प्रा. श्रीकांत पाटील आभार मानले. याच दिवशी संध्याकाळी महिला दिना निमित्त महिलांचा विशेष सत्कार आयोजित केला होता. या समारंभाला एकूण १५ महिलांचा त्यांनी केलेल्या कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे कोरोणा महामारी दरम्यान संपूर्ण गावामधील कोरोना बाधित लोकांची विशेष सेवा करून त्यांनी समाजात स्त्रियांसाठी एक आदर्श निर्माण केला त्याबद्दल त्यांचा सुद्धा विशेष सत्कार घेण्यात आला.

**दि ०९ मार्च २०२२ बुधवार**, रोजी सकाळी ६.३० वाजता प्रार्थना, प्राणायाम व योगासन झाली व ग्रामस्थांशी चर्चा करून दुपारी २.३० वाजता शिबिर स्थळावरून सर्व स्वयंसेवकांनी धामणगाव कडे प्रस्थान केले. अशा प्रकारे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबीर दत्तक ग्राम वाढोणा (गा.) येथे संपन्न झाले. या शिबिराच्या यशस्वितेसाठी सर्व कार्यक्रम अधिकारी, सर्व स्वयंसेवक, आदर्श बरवट, विशाल मोकाशे, तेजस भागवत, कपिल निहिटे, रोशन वरठी, कुणाल हटवार, दिनेश ओकाटे, रेवती गीधाने, पायल गुप्ता, युगा धोपटे, राधा वैद्य यांनी अथक प्रयत्न केले. शेवटी रासेयो सल्लागार समिती चे सदस्य व रासेयो माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य करून शिबिराच्या यशस्वितेकरिता सिंहाचा वाटा उचलला.

**शिबिराचे निवडक छायाचित्रे**




**विशेष श्रम संस्कार शिबिराचे बॅनर**




**रा.से.यो. दत्तक ग्राम वाढोणा (गा) विशेष श्रम संस्कार शिबिर उद्घाटन सोहळा २०२१-२२**





**डावी बाजू: ग्राम स्वच्छता करताना, उजवी बाजू: रक्त गट तपासणी शिबिर**

**शिबिरार्थी ग्राम स्वच्छता करताना (नाले सफाई अभियान)**



**शिबिर दरम्यान आत्मरक्षा शिबिर बोधी बुडोकॉन कराटे प्रशिक्षक श्री सचिन मून**



**श्रम दिंडी व गवळण मधील दिंडी पूजनाचा क्षण**




**शिबिरदारम्यान चा सांस्कृतिक कार्यक्रमा दरम्यान चा एक क्षण**



**दत्तक ग्राम वाढोणा या गावाचा कुटुंब सर्वे करून शाळेच्या मुख्याध्यापिकेला सुपूर्त करण्यात आला**




**घर-घर संविधान गाव-गाव संविधान वर बौद्धिक सत्र – डॉ. रात्नाशील खोब्रागडे सं.गा.बा.आ.वी.**







**विशेष प्रकल्प - जल पुनर्भरण प्रकल्पाचे उद्घाटन व श्रमदानातून पूर्ण करण्यात आला**



**जल पुनर्भरण प्रकल्पाचे अध्यक्षांच्या हस्ते उद्घाटन व लोकार्पण सोहळा**



# शिबिर दरम्यान राबवविलेले विशेष प्रकल्प



जल पुनर्भरण प्रकल्पाची पाहणी करताना श्री संजय पवार अप्पर आयुक्त सामान्य प्रशासन विभाग अमरावती




कुटुंब सर्वेक्षण अहवाल स्वीकार करताना दत्तक ग्राम शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिभा मनोहर मॅडम




हळद लागवड, प्रक्रिया कार्यशाळा: प्रगतीशील शेतकरी श्री सदानंद पाटील, मुडाणा, जिल्हा यवतमाळ

## विशेष श्रम संस्कार शिबिरादरम्यान चे अभिप्राय




आदर्श महाविद्यालय अंतर्गत घेण्यात येणाऱ्या रा. से. यो. कॅम्प हा अतिशीय सुंदर पद्धतीने पार पडला. या कार्यक्रमाचे एक वैशीष्ट्य मला फार आवडले ते म्हणजे शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील सलोख्याचे संबंध यामुळे विद्यार्थी / प्रशिक्षक यांमधील जो शिक्षकासोबत असणारी भीती दुर होवुन त्यांच्यातील सुप्तगुण बाहेर येतात.

त्यासोबतच शिस्त ही मात्र कायम होती त्यासोबत राबवलेल्या इतर ॲक्टीव्हीटी फार चांगल्या वाटल्या. विशेष म्हणजे शोषखड्डा बाबत संकल्पना अतीशीय चांगली होती.


आणी शेतीसंदर्भात जो हळद लागवड हा कार्यक्रम आयोजीत केला तो फार चांगला वाटला. गावासाठी अतीशय प्रेरणादाई कार्यक्रम ठरला.


पोलिस पाटील



या श्रम संस्कार शिबिरामुळे आमच्या गावाला खुप लाभ झाला त्यामुळे आम्ही त्यांचे खुप खुप आभारी. धन्यवाद!

आज दि 12/03/22 रोजी आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे यांच्या मार्फत रा. से. यो तर्फे श्रम संस्कार शिबिर घेण्यात आले. त्या मध्ये जिल्हाअधिकारी यांनी शेतीशाळा विषयी मार्गदर्शन केले. रा. से. यो. च्या वतीने श्रम तपासली आणि एक गन तपासली तसेच जनजागृती केली. मी सर्व रा. से. यो. चे अभिनंदन करत आणि त्यांचे मी खुप आभारी आहे. धन्यवाद






आपल्या सर्वांना खुप खुप शुभकामना,


9/3/22

1) श्री प्रशांतरावजी हुडे (सरपंच) -
2) श्री विजयरावजी पाटील (उपसरपंच) -
3) श्री रुपेशरावजी तिनरे (पोलिस पाटील) -
(4) श्री अरविंद पेठे
(5) श्री प्रकाशराव गुडधे (तंटामुक्ती अध्यक्ष)
(6) गोपाल अ. वाळके
(7) संजय ना. शिरसाट
(8) गिरीधर. वाळके
(9) भाऊराव कांबळे
(10) भिमराव र राऊत
(11) शानु महादेवराव तिनरे


08/03/2022


वर्ष 2021-22 में शिवाजी महाविद्यालय [illegible] के संयुक्त प्रयास से यह शिविर 06.03.22 से 12.03.22 तक बहुत ही सुंदर आयोजन किया गया सभी [illegible] को बहुत बहुत बधाई हो।

[illegible] [illegible]


दिनांक 6/03/2022


राष्ट्रीय सेवा योजनेच्या ग्रामीण शिबिराला भेट दिली असता मला माझे महाविद्यालयीन दिवस आठवले. शिबिरामध्ये बौद्धिक सत्राचे उत्तम विषय, व्यवस्था याशिवाय मुख्य म्हणजे शिबिरामधील शिस्त ही कौतुकास्पद होती. कार्यक्रम अधिकाऱ्याचे विद्यार्थ्यांशी असलेला संवाद सतत लक्षपूर्वक पाहणी. शिबिरास येणाऱ्या पाहुण्यांशी असलेला संवाद वाखाणण्यासारखा होता. या शिबिरातून विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये नक्कीच फायदा होईल. सर्व विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा!

प्रविण खांडपासोळे
संचालक
दिशा संस्था, अमरावती
9766698496



दिनांक 7 मार्च 2022

राष्ट्रीय सेवा योजनेच्या मौजा वाढोणा येथील विशेष श्रमसंस्कार शिबिरात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी यांना मनस्वी शुभेच्छा! या शिबिरात मिळालेले जीवनविषयक ज्ञान व सार सर्वांना सहाय्यभूत व्हावे या सदिच्छा।

(सही)
संजय ज्ञानदेव पवार
उपआयुक्त (खा-प्र.)
विभागीय आयुक्त कार्यालय
अमरावती


खूप छान NSS ने शिबीराचे आयोजन केलेले आहे. विद्यार्थ्यांनी खूप छान प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांची तयारी छान होती. NSS मध्ये सर्व गोष्टी शिकायला येतात. घर घर संविधान गाव गाव संविधान या माध्यमातून संविधानाची जनजागृती होत आहे. आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालयाचे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे अभिनंदन.

(सही) 05/03/2022
Dr. R. N. Khobragade
Asst. Professor
SGB University, Amravati.


आज शिबिरामध्ये आलो. मी माजी विद्यार्थी आहे. मी युवकां पुढील आव्हाने हा विषय आपल्या अनुभवातून ठेवला. अतिशय उत्साही प्रतिसाद व्याख्यानाला मिळाला. स्वावलंबी संस्कार जपणारा मंत्र या शिबिरामधून आपणास मिळणार आहे. सुपरिचित मा. गोडबोले सर, मा. [illegible] सर, बिरे मॅडम, वाकेकर मॅडम पाटील सर, गहूकर मॅडम, इतर मान्यवरांची प्रेरणा मिळाली.


भविष्यात पुन्हा भेटू!

आपलाच
(सही) कुणाल [illegible]
06/03/2022

दिनांक : 07.03.2022

माजी कार्यक्रम अधिकारी या नात्याने शिबिरास भेट आज दि. 07.03.2022 रोजी देताना विशेष आनंद होत आहे. एन.एस.एस. मध्ये घालविलेले क्षण अलगद समोर उभे राहिले. कार्यक्रम अधिकारी श्री. [illegible] पाटील तथा सह. कार्यक्रम अधिकारी डॉ. [illegible] तथा महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. [illegible] यांच्या नियोजनाची झलक शिबिरामध्ये पाऊल ठेवल्याबरोबर लक्षात येते. शिबिरार्थी खूप आनंदात आहेत हे पाहून विशेष आनंद होत आहे. शिबिर शिस्तबद्ध पद्धतीने सुरु आहे. शिबिराच्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा

श्री जितेंद्र सूर्यवंशी (सही)
डॉ. सचिन मनोहरे (सही)
श्री. संदिप पेंदाम (सही)
डॉ. विष्णु सदाफळे (सही)
श्री. प्रेमानंद मेहे (सही)


दि. 07/03/2022

आज दि. 07.03.2022 रोजी ग्राम वाढोणा येथील आदर्श महा. [illegible] एन.एस.एस. अंतर्गत विशेष श्रम शिबिरास भेट दिली असता मनोमन खूप आनंद झाला.. येथील शिस्त, व्यवस्था, व्यवस्थापन आणि शिबिराचे उपक्रम अतिशय योग्य आणि उत्कृष्ट आहेत. मी सर्व आयोजकांना व शिबिरार्थींना शुभेच्छा देतो.

धन्यवाद
(सही)
Dr. R. R. Kurale

आज एन एन एस शिबीराला भेट दिली असता [illegible] मध्ये असलेली शिस्त, तसेच शिबीरामध्ये आयोजित केलेले उपक्रम अतिशय योग्य प्रकारे मुलांनी आयोजित केलेले कार्यक्रम उत्कृष्ट होती मी आयोजकाचे व शिबीरात असलेले विद्यार्थींना पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा देतो

धन्यवाद
(सही)
Dr. S. N. BAYASKAR

आज रोजी एन एस एस शिबिराला भेट दिली असता विद्यार्थ्यांची शिस्त खूप सुंदर होती शिबिरात उपक्रम अतिशय उत्कृष्ट होते

आपला
(सही)
डॉ. राम [illegible]

पहिल्यांदा तर मी खरंच आभार मानते की, राष्ट्रीय स्वयंसेवक योजनेचा कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार रुजवण्याचे कार्य तत्परतेने करताय. आजचा कार्यक्रम हा हळद लागवडीचा होता. कार्यक्रमात झालेले मार्गदर्शन अतिशय उपयुक्त ठरले. विद्यार्थ्यांनी व शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्व अधिकाऱ्यांचे व विद्यार्थ्यांचे खूप खूप अभिनंदन व कौतुक

(कु. राधिका सु. कडेकर)
गणित विभाग.

आज दि. 07/03/2022 रोजी आदर्श महाविद्यालय धा.रे. द्वारा आयोजित राष्ट्रीय सेवा योजना संस्कार शिबिराला भेट दिली असता विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण, सामाजिक जाणीव आणि विद्यार्थ्यांनी केलेले काम फार कौतुकास्पद होते. आणि हे सगळे गुण विशेष राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्देश्य आहे. या शिबिरामध्ये अत्यंत उस्फूर्त प्रतिसाद दिला याबद्दल सेवा योजनेच्या सर्व अधिकाऱ्यांचे विशेष मनापासून अभिनंदन आणि त्यांनी आम्हाला या शिबिरासाठी आमंत्रित केल्यामुळे त्यांचे फार फार धन्यवाद !

कु. प्रणाली वि. वाकेकर
07/03/2022.

समाजसेवेचे व्रत उराशी बाळगून जनजागृती करण्याचे तसेच आत्मविश्वास वाढविणारे हे श्रमसंस्कार शिबिर विद्यार्थी जीवनात अतिशय मोलाचे ठरेल.

श्रीकांत पाटील सर, केचे सर व सर्व राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी व स्वयंसेवकांचे खुप अभिनंदन व कौतूक.

6.3.22
जितेंद्र बारूळकर

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण, सामाजिक जागृती व विशेष श्रम संस्कार, आदर अशा प्रकारचे गुण पेरणे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्देश्य आहे. व या शिबिराच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व कार्यक्रम अधिकारी यांनी अतिशय मेहनत घेऊन हे उद्देश पुर्ण केलेले आहे.

या शिबिराच्या निमित्ताने अतिशय सुंदर व उपयोगी व्याख्यान राबविण्यात आले. तसेच हळद लागवड प्रक्रिया व विक्री, घर घर संविधान अशा प्रकारच्या कार्यशाळा घेण्यात आल्या त्याचा नक्कीच विद्यार्थ्यांना व शेतकऱ्यांना विशेष फायदा होणार. अतिशय आनंदात, उत्साहात हे शिबिर पार पडत आहे याबद्दल सेवा योजनेच्या सर्व अधिकाऱ्यांचे विशेष कौतुक व अभिनंदन.

6/03/2022
(डॉ. अश्विनी रंगारी)
(गणित विभाग)

तिसरा दिवस

दि. 06/03/2022

या शिबिरातून देशासाठी जबाबदार नागरिक निर्माण होईल व त्याची सुरुवात येथून होईल अशी अपेक्षा करतो व शिबिरासाठी शुभेच्छा.

प्रदीप लोनर.

आज दिनांक 06/03/2022 रोजी आदर्श महाविद्यालय, धा.रे. द्वारा आयोजीत राष्ट्रीय सेवा योजनाचे संस्कार शिबीराला भेट दिली असता येथील शिस्त आणि नियोजन पाहून खऱ्या अर्थाने आपण शिबीराला भेट दिल्याचे सार्थक झाले. या शिबीराचे विशेष म्हणजे श्रमदानातुन रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प शाळेकरिता बेलका हे एक नाविन्यपूर्ण काम हाती घेतल्याचे दिसून आले त्या मुळे एक नविन आदर्श निर्माण करणारे आहे.

आपणास पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा !

विशाल खुटे
माजी विद्यार्थी रा.से.यो

दि 06/03/2022

या शिबीरातुन देशासाठी जबाबदार नागरिक निर्माण होईल व त्याची सुरुवात येथून होईल. अशी अपेक्षा करतो व शिबीरासाठी शुभेच्छा

सौ ज्योती लिखाडे

आज दिनांक 06/03/2022 रोजी आदर्श महाविद्यालय, धा.रे. द्वारा आयोजीत राष्ट्रीय सेवा योजनाचे संस्कार शिबीराला भेट दिली आम्हाला पुष्प गुच्छ देऊन त्यांनी आभार सत्कार केले आमच्या गावामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर आले आमचे हे भाग्यच आहे या शिबीरामुळे आम्हाला नविन माहिती शिकायला मिळाली

सौ अहिल्या गाते

1). I hearty congratulate to all the students & organizing team who involved in NSS camp. I appreciate their hard work & dedication for this camp. I also congratulate the team of microbiology department, Adarsh Mahavidyalaya for blood group testing camp. I wish all the best to entire NSS team.


Dr. S. S. Sharma

आज दि. 05/03/2022 रोजी आदर्श महाविद्यालय धामणगांव रेल्वे द्वारा राष्ट्रीय सेवा योजने तर्फे श्रम संस्कार शिबीरला भेट दिली. तेथील शिस्त, नियोजन पाहून. मी पण त्या दिवसापासून मला असे वाटले की आपणपण आपल्या जिवनात शिस्त लावून घ्यावी. आपण आपल्या वाढोणा गावामध्ये असेच राष्ट्रीय सेवा योजनेचे दरवर्षी शिबीराचे आयोजन करावे, आणि आमच्या गावात सर्वांना शिस्त लावावी. आज आमच्या शाळेमध्ये रेन वॉटर हारवेस्टींग प्रकल्प करून दिला यावबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.

असेच आपण वाढोणा गावकरीयांना मार्गदर्शन करावे. मी याबद्दल सर्व अधिकारी वर्गाचे श्री श्रीकांतजी पाटील, केचे सरांचे, व ठाकूर मॅडमचे मनपूर्वक अभिनंदन करतो.

पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा

विजय पाटील
उ.सरपंच वाढोणा



दुसरा दिवस

राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामध्ये विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सांघिक भावना निर्माण होण्यास मदत होते ते या शिबिरामध्ये दिसले. श्रमाचे मुल्य विद्यार्थ्यांमध्ये दिसले

पंकज मुरलीधर धामणे
क. म. शिक्षक आ.म.वि. धा.रे.

राष्ट्रीय सेवा योजना शिबिर मध्ये विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात [illegible] होते. माझा एक चांगला अनुभव

N. A. Choudhari
क. म. शिक्षक आ.म.वि. धा. रेल्वे


राष्ट्राबद्दल प्रेम फार महत्वाचे आहे आणि ते या शिबिर मध्ये असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून आले कारण ते समाजसेवा किंवा राष्ट्राकरिता फुल व किंवा फुलाची पाकळी सेवेद योगदान देत आहेत. हे सर्व पाहून फार आनंद वाटला. विद्यार्थ्यांमध्ये समाज आणि राष्ट्राविषयी जागृती फार महत्वाचे आहे. कोणत्याही राष्ट्राला प्रगत व्हायचे असेल तर त्यामध्ये नविन पिढी किंवा विद्यार्थी हे फार महत्वाचे घटक आहेत.

H. P. Mungse.
Asst. prof. department of chemistry.

I warmly Congratulate to all the People who involved in the N.S.S. Camp. Today's speech by Resp. Dhamore sir, was very intresting and awareness of vote to all of us was motivating.
Thanks for such new hour to us. and my best wishes to The Team.

कु. आकांक्षा वि. ठुसर

Saema Anjum.



पहिला दिवस दि. 03/03/2022

1) EXCELLENT ARRANGEMENTS NICE PROJECTS IMPLEMENTATION OF TURMERIC FARMING IN WADHONA (NEW CONCEPT FOR VILLAGE) I EXTEND MY BEST WISHES TO TEAM NSS OF ADARSH MAHAVIDYALAYA DHAMANGAON

03/3/22
(Dr. ASIT PASARI)

2) first of all I wish to congratulate all who are directly and indirectly involved in the present N.S.S. Camp.
The subject choosen are need of hour.
Nice arrangement and well organised.
My best wishes to all Team.

Adv Ashish Rathi

3) राष्ट्रीय सेवा योजना एकदिवसीय आयोजित विशेष श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन झाले. अत्यंत सुंदर आयोजन करण्यात आले. [illegible]

3/3/2022

